गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ३० वा ● रविवार १६ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 30 | Date : 16/06/2024 blow Sunday Page 4 Price 4

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाची निविदा प्रक्रिया गतीने राबवा : उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेली भिडेवाडा येथील पहिली मुलींची शाळा येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याच्यादृष्टीने आवश्यक ती प्रक्रिया करुन गतीने निविदा प्रक्रिया राबवावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत दिले.विधानभवन येथे झालेल्या या बैठकीस विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, मनपाचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे, मुख्य अभियंता बांधकाम युवराज देशमुख आदी उपस्थित होते.

हे स्मारक पार्किंग तसेच तळमजला अधिक तीन असे चार मजल्यांचे करण्याचा बैठकीत घेण्यात आला. पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावर सावित्रीबाई फुले यांचा पुतळा, त्यांचा जीवनपट दर्शविणारे म्युरल्स किंवा चित्रमय व्यवस्था, वरील मजल्यावर त्यांच्या जीवनातील प्रसंग, कार्याची माहिती स्क्रीनवर दृकश्राव्य स्वरुपात दर्शविण्याची यंत्रणा तसेच त्यांचे लेखन साहित्य त्याशिवाय वरील मजल्यावर मुली, महिलांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्था अशी व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. पवार आणि मंत्री श्री. भुजबळ यांनी दिले.

स्मारकासाठीच्या सभोवतालच्या जागेचे भूसंपादनासाठी राज्य शासन आणि महानगरपालिका दोन्ही यंत्रणा रक्कम देणार आहे. स्मारकाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा प्रसिद्ध करण्याच्यादृष्टीने गतीने काम करावे, अशाही सूचना यावेळी देण्यात आल्या.



फुलेवाडा येथील महात्मा फुले यांच्या स्मारकाच्या विस्ताराचाही आढावा

सन १९९२ साली पुणे शहारातील महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे राहते घर राष्ट्राला अर्पण करून सदर वास्तू राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेली आहे. हे स्मारक व त्याच्या परिसराचे नूतनीकरण व जतन करण्यासाठी आवश्यक कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेले आहेत.या स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी लगतचे जागामालक आणि भाडेकरु यांना मोबदला यासाठी भूमिसंपादनाची आवश्यक तेवढी रकमेची मागणीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा. त्यास तात्काळ मान्यता देण्यात येईल, असेही श्री. पवार यावेळी म्हणाले.

## उजनी पर्यटन विकास आराखड्यासाठी सुमारे १५० ते २०० कोटीचा निधी मंजूर : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**⁕उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्यासमोर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा सादर केला ⁕आमदार संजय शिंदे यांच्याकडूनही या प्रकल्पासाठी पाठपुरावा**

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्हा हा पर्यटनासाठी खूप महत्त्वाचा जिल्हा असून येथे उजनी धरणात जल पर्यटन, ९१ धार्मिक स्थळे असल्याने धार्मिक पर्यटन, कृषी क्षेत्रात अग्रेसर असल्याने कृषी पर्यटन तसेच विनयार्ड पर्यटन विकसित होण्यासाठी पायाभूत सोयी सुविधा निर्माण केल्यास जिल्ह्याचा पर्यटनाच्या दृष्टीने



सर्वांगिण विकास होऊन येथे देश विदेशातील पर्यटकांची संख्या वाढून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्याकडे जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा सादर केला. आराखड्यास तात्काळ उपमुख्यमंत्री यांनी तत्वत: मान्यता देऊन यासाठी सुमारे १५० ते २०० कोटीच्या निधीची तरतूद करण्यात येईल, । पान २ वर

### ⁕पर्यटन प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर....

सोलापूर जिल्हा हा भारतातील एकमेव असा जिल्हा आहे ज्या ठिकाणी जल, कृषी आणि ग्रामीण पर्यटन यांचे अनोखे मिश्रण असलेला जिल्हा आहे. उजनी धरण हा या पर्यटन आराखड्याचा केंद्रबिंदू आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे १५० ते २०० कोटीचा खर्च अपेक्षित आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यात देशी विदेशी पर्यटकांच्या संख्येत खूप मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे. या ठिकाणी विविध व्यवसायांची निर्मिती होऊन मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर चालना मिळवून येथील ग्रामीण जीवनमान यांच्यात बदल घडवून त्यांची आर्थिक उन्नती साधली जाणार आहे येथील लोकांना शाश्र्वत उत्पन्नाचा स्त्रोत कायमस्वरूपी उपलब्ध होणार आहे.

## 'एनडीए सरकार कधीही कोसळू शकतं', काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंचं सूचक विधान

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली. तसेच एनडीए सरकार हे चुकून स्थापन झाले असून पुढील काळात हे सरकार कधीही कोसळू शकते, असे विधानही त्यांनी केले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने २४० जागांवर विजय मिळविला. बहुमताचा २७२ हा आकडा त्यांना गाठता आला नाही. यासाठी त्यांना एनडीएतील मित्रपक्षांवर अवलंबून राहावे लागणार आहे.





मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, एनडीए सरकार चुकून स्थापन झाले आहे. मोदींकडे बहुमत नाही. त्यांचे सरकार अल्पमतात आहे. त्यामुळे हे सरकार कधीही पडू शकते. आम्हाला तर वाटते सरकार पाच वर्ष चालावे, देश चांगल्या पद्धतीने चालला पाहीजे. देश बळकट करण्यासाठी आम्ही सर्व एकत्र येऊन काम करू. पण आमच्या पंतप्रधानांची सवय आहे की, जी गोष्ट व्यवस्थित सुरू आहे, ती त्यांच्या पचनी पडत नाही. आमच्या बाजूने आम्ही देशासाठी काम करत राहू.काँग्रेस अध्यक्ष खरगे यांनी पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या आघाडीच्या सरकारवर टीका । पान २ वर

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अक्कलकोट तालुकाध्यक्षपदी तिसऱ्यांदा कमलाकर सोनकांबळे यांची निवड

**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची नूतन कार्यकारणीची बैठक जुना डाक बंगला अक्कलकोट येथे जेष्ठ पत्रकार चेतन जाधव, जेष्ठ पत्रकार बसवराज बिराजदार व जेष्ठ पत्रकार दयानंद दणुरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते.य़ा बैठकीत सर्व सदस्य पत्रकारांच्या उपस्थित नूतन अध्यक्षपदी कमलाकर सोनकांबळे तर सचिवपदी विश्र्वनाथ चव्हाण याची एकमताने निवड करण्यात आली.



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सदस्य दयानंद दणुरे यांनी जुन्या अध्यक्ष व सचिव यांना पुन्हा एकदा काम करण्याची संधी द्यावी.अशी सूचना मांडले होते.त्यास गौतम बालशंकर यांनी अनुमोदन दिले.यावेळी सर्व सदस्यांच्या उपस्थित अध्यक्षपदी कमलाकर सोनकांबळे तर सचिवपदी विश्र्वनाथ चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नूतन कार्यकारणी अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे, । पान २ वर

## जिल्हा परिषद शाळेच्या पहिल्या दिवशी गोगांव येथे गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत



**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

जिल्हा परिषद शाळा गोगांव येथे १५ जून शाळेचा पहिला दिवस म्हणून शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर जगताप यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, ज्योती आलूरे, भाग्यश्री नीळ यांनी औक्षण केले. त्यानंतर गुलाबपुष्प व बिस्कीट देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी शासनाकडून आलेले पाठ्यपुस्तक सर्व विद्यार्थ्यांना उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी शरणप्पा कलशेट्टी, अंगणवाडी सेविका भाग्यश्री सोनकवडे, तेजाबाई गुरव, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष शरणप्पा मुळजे, अनिल मुलगे, मुख्याध्यापक दयानंद चोळे फुडलिक वाघमारे, शंकर कारभारी, महादेव चव्हाण सर्व शिक्षक उपस्थित होते.यावेळी जिल्हा । पान २ वर



दैनिक
यश सिद्धि न्यूज



# सिंदखेडराजा पंचायत समिती मध्ये रोजगार हमीच्या कामामध्ये मस्टर घोटाळा !

**बुलढाणा /राहुल साबळे**

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा तालुक्यामधे पंचायत समिती कार्यालयात रोजगार हमी योजनेमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये मस्टर घोटाळा झाला असून याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.कारण जी व्यक्ती कामावरच नाही अशा लोकांची बिले काढण्यात आली आहे यामध्ये रोजगार सेवक,सचिव,यांची साखळी असून या साखळीतील सर्वांना हाताशी धरून पंचायत समिती मधील कर्मचारी लाखो रुपयांचा शासनाला चुना लावताना दिसून येत असून या सर्व कर्मचाऱ्यांची,अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी झाली पाहिजेत.ज्यांची मस्टर ऑनलाईन घेतल्या जात नाही त्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होताना दिसत आहे.त्यामध्ये ज्यांचे वय ७५ वर्षापेक्षा जास्त आहे अशा लोकांची नावे टाकून पैसे काढले जातात काही ठिकाणी तर मयत लोकांच्या नावे पैसे काढण्याचे

**स्वाभिमानीचे अमोल मोरे यांची जिल्हाधिकारी यांना तक्रार अर्जाद्वारे चौकशीची मागणी**



आढळून आले आहे.अनेक ग्रामपंचायतीमध्ये वृक्ष लागवडीच्या नावाखाली कोटीची बिले काढले आहे.म्हणून स्वाभिमानीच्यावतीने सिंदखेड राजा पंचायत समितीमध्ये झालेल्या सर्व रोजगार हमी योजनेतील कामाची संपूर्ण चौकशी करण्यात यावी आणि संबंधित कर्मचाऱ्यांची सुद्धा खाते निहाय चौकशी झाले पाहिजेत.अशी तक्रार स्वाभिमानाची अमोल मोरे यांनी निवेदनाद्वारे माननीय जिल्हाधिकारी बुलढाणा यांना देण्यात आली आहे

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात शाळेच्या पहिल्या दिवशी गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**अक्कलकोट/प्रतिनीधी**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयात शनिवार दिनांक १५ जून २०२४ रोजी शाळेचा पहिला दिवस म्हणून संस्थेचे संस्थापक कै. पंचप्पा कल्याणशेट्टी व माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक मराठी, कन्नड व सेमी इंग्रजी माध्यमाच्या सर्व मुलांना संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी व सीईओ रूपाली शहा यांनी औक्षण केले. त्यानंतर गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तद्नंतर विद्यार्थ्यांनी अतिशय




उत्साहात व आनंदात शाळेत प्रवेश केला. यावेळी शासनाकडून आलेले पाठ्यपुस्तक सर्व विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

यावेळी संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी, शिक्षण विभाग प्रमुख सौ रूपाली शहा, ज्युनिअर कॉलेज प्रमुख पूनम कोकळगी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप आदी मराठी, कन्नड, सेमी विभागाचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

**शाळेचा पहिला दिवस म्हणून संपूर्ण शाळा सजवले होते. गेटवर सुंदर रांगोळी, दर्शनी भागात रंगीबेरंगी फुगे लावले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व आनंद दिसून आला. शेवटी इ.५ वी ते ८ वी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले.**

# सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्यावतीने अक्कलकोट तहसीलदार यांना निवेदन



**अक्कलकोट/प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सम्यक विद्यार्थी आंदोलन सल्लागार समिती सदस्य महेश भारतीय सर यांच्या आदेशाने संपूर्ण महाराष्ट्रात तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यांना आज निवेदन देण्यात आले. अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात विशेष अध्ययने करण्यासाठी 'राजषी शाहू महाराज' योजनेत जाचक अटी - शर्ती लागू केल्या आहेत.

त्या विरोधात सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने तहसीलदार अक्कलकोट यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या , परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जाचक अटी शिथिल करण्यात याव्यात जसे की, उत्पन्न मर्यादा ही वार्षिक १६ लाख रुपये पर्यंत व वयाची अट किमान ४५ वर्षे पर्यंत वाढवण्यात यावी., परदेशी शिष्यवृत्ती साठी येणाऱ्या विद्यार्थी अर्जाची मर्यादा ७५ वरून १५० पर्यंत करावी., ८०% गुणांची अट रद्द करून ती कमीत कमी ६०% करावी., केरळ राज्य सरकारने ज्या डजझ नुसार परदेश शिक्षण शिष्यवृत्तीची योजना आखली आहे. त्याच पद्धतीने महाराष्ट्र राज्य शासनाने योजना आखावी., समाज कल्याण आयुक्त कार्यालय, पुणे व विभागीय आयुक्त यांच्या कार्यालय स्तरावरून सदर परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जनजागृतीसाठी शक्य होईल तशी मदत केंद्रे उभारावी., विद्यापीठांचे ऑफर जोईनिंग लेटर आल्यास पात्र विद्यार्थ्यास विमान प्रवासाचे पैसे त्वरित त्याच्या खात्यावर तारखेच्या १५ दिवस अगोदरच जमा करावे.

यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलन महाराष्ट्र राज्य प्रदेश प्रवक्ता रविराज पोटे , साहिल कांबळे, दर्शन गायकवाड, महेश बनसोडे, लक्ष्मण बनसोडे, विकास वाघमारे, इरेश गायकवाड, आदीसह विद्यार्थी उपस्थित होते



# जगदगुरू पंचाचार्य प्रशालेत नवागतांचा विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन स्वागत

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

गौडगाव बु(ता.अक्कलकोट)येथे श्री गुरु सिद्धमल्लेश्र्वर कल्याण केंद्र गौडगाव संचलित श्री जगदगुरू पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत शैक्षणिक वर्ष २०२४,२५ या वर्षाच्या पहिल्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन नवागतांचे स्वागत करण्यात आले.तसेच शासनाच्या मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत प्रशालेतील इयत्ता पाचवी ते आठवी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले.प्रशालेतील व बोर्डाची परीक्षा कॉपीमुक्त होण्याच्या दृष्टीने कॉपीमुक्त परीक्षाची शपथ घेण्यात आली.यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी व सर्व शिक्षक शिक्षकेतर सेवक वर्ग व बहुसंख्या विद्यार्थी,पालक वर्ग उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवपुत्र चोल्ले यांनी केले तर आभार वीरेश दानशेट्टी यांनी मानले.

# निफाड नगरपंचायत हद्दीतील प्र. क्र. चार मधील रस्ता अतिक्रमणाच्या विळख्यात

**निफाड/प्रतिनिधी**

निफाड नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रं. चार मधील होळकर नगर ते शंकर नगर ला जोडणाऱ्या शासकीय चारीवर अतिक्रमण करून हा रस्ता बंद केला आहे सदर रस्त्यावरील चारी वर झालेली अतिक्रमण त्वरित बंद करण्यात यावी अशी मागणी निफाड नगरपचायत च्या माजी नगराध्यक्ष शारदा नंदकुमार कापसे केली आहे निफाड नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रं. चार मध्ये होळकर नगर ते शंकर नगरला जोडणारा रस्ता एका खाजगी व्यक्तीने अतिक्रमण करून शासकीय चारीवर अतिक्रमण केले आहे हा रस्ता व चारी बंद झाला असून यामुळे येणाऱ्या पावसाळ्यात सदर चारीला पाणी आल्यास नागरिकांच्या घरात तसेच शेजारील शेतात पाणी जाऊन शेताचे व घरांचे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे तरी सदर रस्त्यावरील अतिक्रमण काढून रस्ता व चारी पूर्ववत करण्यात यावा, सदरचे काम त्वरित बंद न झाल्यास व काही जीवित हानी झाल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा निफाड नगरपंचायतच्या माजी नगराध्यक्ष शारदा नंदकुमार कापसे यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे,

# शिवणी आरमाळ ग्रामपंचायत उपसरपंचपदी संध्याताई आरमाळ यांची निवड

**देऊळगाव राजा/ दिलीप वनवे**

देऊळगाव राजा तालुक्यातील शिवणी आरमाळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी संध्याताई सतिष आरमाळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

शिवणी आरमाळ ग्राम पंचायतीच्या विद्यमान उपसरपंच यांनी आपसात ठरल्याप्रमाणे आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिला होता.त्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या विधान उपसरपंच पदासाठी ग्राम पंचायत



शिवणी आरमाळ कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली.यावेळी उपसरपंच पदासाठी संध्याताई सतिष आरमाळ यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी यांची बिनविरोध निवड जाहीर केली.यावेळी ग्रामपंचायत ग्रामसेवक,आजी माजी सरपंच,उपसरपंच,सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपसरपंच पदी निवड जाहीर झाल्या नंतर गावकऱ्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. 'वच्या गावकऱ्यांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्र्वासाला कधीही तडा जाऊ न देता गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया यावेळी नवनिर्वाचित उपसरपंच यांनी दिली आहे.

# साखरेवस्ती शाळेत नवागतांचे स्वागत



**इंदापुर/अतुल सोनकांबळे**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साखरे वस्ती येथे नवागतांचे स्वागत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन श्री. नानासाहेब खरात उपस्थित होते तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश साखरे, अंगणवाडी सेविका व माता पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .

प्रमुख पाहुणे नानासाहेब खरात व इतर मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रथम नवागतांचे स्वागत पुष्प देऊन करण्यात आले त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री. नानासाहेब खरात यांनी सर्व मुलांना लेखन साहित्याचे वाटप केले, यावेळी नानासाहेब खरात म्हणाले की खरंच जिल्हा परिषद शाळा या मुलांना खरंच संस्काराचे खूप मोठे केंद्र आहेत जिल्हा परिषद शाळेत शिक्षणाबरोबर संस्कारही मोलाचे मिळतात,तेजपृथ्वी ग्रुपच्या माध्यमातून या शाळेसाठी कायमस्वरूपी जेवढे बी चांगले उपक्रम असतील ते राबवण्याचा आजपर्यंत आणि इथून पुढेही कायम आम्ही प्रयत्न करू यावेळी शाळेकडून विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करण्यात आली तर तेजपृथ्वी ग्रुपच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना वही पेन खाऊ अंकलपी व इतर शाळेचे साहित्य वातप करन्यातआले,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक श्री काकासाहेब जाधव यांनी केले. शेवटी मुलांना गोड खाऊचे वाटप करून कार्यक्रमाचे आभार शाळेतील शिक्षक श्री. मल्लिकार्जुन वच्चे गुरुजी यांनी मांडले. अतिशय उत्साहाच्या वातावरणात कार्यक्रम पार पडला.

# डुबेरे विद्यालयात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व पाठ्यपुस्तके देऊन स्वागत ..

**सिन्नर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन ढोल ताशाच्या गजरात विद्यालयमार्फत स्वागत करण्यात आले. इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य रामदास वाजे यांनी आपल्या प्रास्ताविकात शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती देवून मान्यवरांचे स्वागत केले. बऱ्याच कालावधी नंतर शाळेची घंटा वाजल्याने आज विद्यार्थ्यांची किलबिलाट ऐकू आली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह दिसून येत होता. विद्यार्थी एकमेकाची आस्थेने व प्रेमाने विचारपूस करीत होते. विद्यार्थी गप्पा गोष्टीत रंगले होते .विद्यालयाच्या प्रवेशद्वारावर सडा टाकून रांगोळी काढली होती.

अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष नारायण शेठ वाजे होते.व्यासपीठावर उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल



वामने,सदस्य अर्जुन वाजे,विजय दादा वाजे,दामोदर कुंदे ,विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अशोक गवळी ,प्रभारी प्राचार्य तथा पर्यवेक्षक रामदास वाजे आदिंसह पालक उपस्थित होते.यावेळी नारायण वाजे यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.शिक्षक शिकवित असतांना विद्यार्थ्यांनी वर्गात समरस व्हावे. चांगला अभ्यास करून उज्ज्वल यश संपादन करून आई-वडिलांचे व शाळेचे नाव उज्ज्वल करावे असे आव्हान वाजे यांनी केले. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आंतर्गत मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले. इयत्ता १२ वी व इयत्ता १० वीच्या परीक्षेत प्रथम पाच क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा भेटवस्तू व गुलाबपुष्प देवून सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन पी.आर.करपे यांनी तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले.यावेळी रामदास वारुंगसे,डी. एच. जाधव, सोमनाथ पगार, राजश्री घुमरे,डी. ए.रबडे,के.एस.शिंदे, राजेंद्र गांगुर्डे,सुनिल ससाणे, टी. के.बहिरम,सीमा गोसावी, सुषमा थोरात, एस.बी.गुरूळे आदींसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




# आमदार दत्तात्रय भरणे यांच्याकडून शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत

**इंदापूर/अतुल सोनकांबळे**

जवळपास दोन महिन्यांच्या उन्हाळी सुट्टीनंतर सर्वत्र शाळेची घंटा वाजली असुन शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी सर्वच शाळांमध्ये विद्यार्थ्यांची किलबील पुन्हा एकदा घुमायला चालु झाली आहे.याच निमित्ताने आज माजी मंत्री तथा इंदापूरचे विद्यमान आमदार दत्तात्रेय भरणे यांनी इंदापूर शहरातील सरस्वती नगर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला सदिच्छा भेट देऊन शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

आज आमदार भरणे यांनी सकाळी सात वाजल्यापासूनच इंदापूर शहरामध्ये प्रशासकीय बैठकांना उपस्थित रहात विविध विभागांचा आढावा घेतला.यामध्ये क्रीडा संकुल ला भेट देऊन खेळाडूंबरोबर संवाद साधुन त्यांच्या अडी-अडचणी जाणून घेतल्या.त्यानंतर संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याची आढावा बैठक घेतली.तसेच टंचाई आढावा व समन्वय समितीची ही बैठक घेऊन त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला अनेक मुद्द्यांवर सूचना केल्या आहेत.तसेच सरस्वतीनगर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला सदिच्छा भेट देऊन शालेय विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला.यावेळी आमदार दत्तात्रय भरणे यांनी गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले व त्यांना शालेय साहित्याचे वाटप करून या शैक्षणिक वर्षासाठी श्री.भरणे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार भरणे यांच्या समवेत माजी पंचायत समिती सदस्य सतीश पांढरे, राष्ट्रवादीचे इंदापूर शहराध्यक्ष बाळासाहेब ढवळे,नगरसेवक पोपट शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी शिक्षण आणि प्रशिक्षणावर भर द्यावा: डॉ.नीलम गोऱ्हे

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी नियमांमध्ये सुधारणा करण्यासह शाळाबाह्य मुलांचे शिक्षण आणि पाल्य व पालकांच्या प्रशिक्षणावर भर द्यावा, तसेच वाहतूक नियोजन आणि रस्ता सुरक्षेबाबतही आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिले.

पुण्यात अलिकडे झालेल्या अपघाताच्या पार्श्र्वभूमीवर वाहतूक नियोजन, बालगुन्हेगारी प्रतिबंध आणि ससून रुग्णालयातील व्यवस्थापनाबाबत दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस महिला व बालविकास आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे, महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवडचे प्र.पोलीस आयुक्त सुनील रामानंद, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, ससूनचे अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत म्हस्के, उत्पादन शुल्क विभागाचे उपअधीक्षक सुजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी उपस्थित होते.

डॉ.गोऱ्हे म्हणाल्या, बाल न्याय कायद्यानुसार गंभीर गुन्ह्याबाबत कारवाई करताना गुन्हेगारांना प्रौढ समजण्यात यावे यादृष्टीने नियमांचा अभ्यास करून कार्यप्रणाली निश्र्चित करण्याचा प्रयत्न करावा. जिल्हाधिकाऱ्यांकडे होणाऱ्या बाल कल्याण समितीच्या बैठकांमधील कामकाज गांभिर्याने होईल याकडे लक्ष द्यावे. बाल गुन्हेगारी रोखण्यासोबत गंभीर गुन्ह्यात शिक्षा होईल यादृष्टीने कार्यवाही करण्यावर भर द्यावा. महानगरपालिकेने शाळाबाह्य मुलांना शाळेत आणण्याची मोहिम राबवावी, यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. पोलीस विभाग गुन्हे शोधण्यासाठी उपयोग करीत असलेली सीसीटीएनएस प्रणाली बाल गुन्हेगारांसाठी लागू करण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यात येईल.




शहरातील ब्लॅकस्पॉटची माहिती संकलीत करून अशा ठिकाणी सीसीटीव्ही लावल्यास वाहतूकीवर चांगल्याप्रकारे नियंत्रण करता येईल. सण आणि उत्सवांच्या कालावधीत वाहतूक नियंत्रणाबाबत आतापासून नियोजन करावे. शहरातील अतिक्रमणे काढण्याबाबत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा अहवाल महानगरपालिकेने सादर करावा. महानगरपालिका आणि पोलीस विभागाने अपघात रोखण्यासाठी संयुक्त मोहिम राबवावी.

ससून रुग्णालयाने नागरिकांच्या तक्रारी कमी करण्यावर भर द्यावा. आरोग्य सेवेत ससून रुग्णालयाचा लौकीक चांगला असून तो वाढविण्याचा प्रयत्न करावा. आरोग्य क्षेत्रातील चांगल्या स्वयंसेवी संस्था आणि व्यक्तींची मदत घेवून कामकाजात पारदर्शकता वाढविण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले.

मद्यसेवनासाठी परवाना देण्यासाठी भरावयाचे शुल्क वाढविण्याबाबत आणि एक दिवसाचा परवाना देताना मुले अल्पवयीन आहेत का हे तपासण्यासाठी काटेकोर नियमावली करणे शक्य आहे का याचा विचार करावा. मद्य विक्री आणि परवान्याचा वापर याचा ताळमेळ घेण्याची व्यवस्था निर्माण करता येईल का याचा विचार करावा. अवैध दारू विक्रीवर प्रतिबंध करण्यासाठी विशेष मोहिम राबवावी, असे निर्देशही डॉ.गोऱ्हे यांनी दिले.

आयुक्त डॉ. नारनवरे म्हणाले, बाल न्याय कायद्यानुसार बालगुन्हेगारांचे पुर्नवसन करण्यावर भर देण्यात आला आहे. बाल न्याय मंडळातील महिला व बालविकास विभागातर्फे नियुक्त प्रतिनिधींच्या प्रशिक्षणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. वारंवार गुन्हे करणारे आणि गंभीर गुन्ह्यातील बालगुन्हेगारांवर कारवाई करण्यासाठी नव्या बाल कायद्याबाबत राज्यासाठीची नियमावली लवकरच करण्यात येत आहे. त्यात प्रशिक्षण आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर देण्यात येणार आहे. बाल न्याय मंडळ आणि बाल कल्याण समितीच्या कामकाजातही सुधारणा करण्यात येत आहे.

महानगरपालिका आयुक्त डॉ. भोसले म्हणाले, अनधिकृत हॉटेल आणि रुफ टॉप हॉटेलवर महानगरपालिकेतर्फे कारवाई करण्यात आली आहे. शहरातील पदपथावरील आणि रस्त्याच्या बाजूला असेलेली अतिक्रमणे काढण्याची मोहिम सुरू करण्यात आली आहे. नियमबाह्य जाहिरात फलकांवर कारवाई करण्यात येत आहे. वाहतूक सुरक्षेच्यादृष्टीने रस्त्यांच्या रचनेत सुधारणा करण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, पुणे शहरातील वाहतूक सुरक्षेबाबत मागील १५ दिवसात पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत दोनदा बैठक घेण्यात आली असून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. शहरातील सुमारे ५० ब्लॅकस्पॉटबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. अवजड वाहनांना शहराच्या मध्यभागात वाहतूकीसाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. १६ ते १८ वर्षातील बालगुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी पालकांचे समुपदेशन करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्त श्री.रामानंद म्हणाले, पिंपरी चिंचवड शहरात रात्री 'ड्रिंक ण्ड ड्राईव्ह' ला प्रतिबंध घालण्यासाठी विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे वाहतूक नियमांविषयी समुपदेशन करण्यात येत आहे. डॉ.म्हस्के म्हणाले, ससून रुग्णालयाच्या कामकाजात पारदर्शकता आणि सुसूत्रता आणण्यासाठी आदर्श प्रणाली निश्र्चित करण्यात आली आहे.

दररोज कामकाजाचा आढावा घेण्यात येत आहे. चांगली रुग्णसेवा देण्याचा रुग्णालय प्रशासनाचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले.अतिरिक्त आयुक्त श्री.खोराटे यांनी पिंपरी चिंचवड शहरात वाहतूक नियोजन आणि रस्ता सुरक्षेबाबत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. उत्पादन शुल्क विभागाचे श्री.पाटील यांनी उत्पादन शुल्क विभागातर्फे करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.

# श्री माताजी निर्मला देवी प्राथमिक विद्यामंदिर मध्ये प्रवेशोत्सव उत्साहात




**पंढरपूर/दैनिक यशसिध्दी न्यूज**

श्री रुक्मिणी विद्यापीठ संचलित श्री माताजी निर्मलादेवी प्राथमिक उच्च प्राथमिक विद्यामंदीर शाळेत नवागतांचे स्वागत उत्साहात करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री प्रमोद जाधव व श्री सोमनाथ राजगुरू हे पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री संतोष कवडे सर होते. शाळेत दाखल झालेल्या नवागत मुलांचे स्वागत शैक्षणिक साहित्य, शालेय पाठ्यपुस्तके ,पेन ,फुगे देऊन करण्यात आले. शाळेचा पहिला दिवस मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. मुलींनी रांगोळी काढून ,तोरण व पताका बांधून शाळा सजवण्यात आली होती.

मुलांना पहिल्या दिवशी नवीन पुस्तके मिळाल्याने मुले आनंदी दिसत होती. तर काहींना शाळेच्या दुनियेत पहिले पाऊल ठेवणे जड गेले. पालकांना सोडून वर्गात जाताना काही मुलांचे डोळे भरून आले.

संस्था सचिवा मा. सुनेत्राताई पवार यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. पालक श्री प्रमोद जाधव यांनी मुलांना शाळेच्या पहिल्या दिवसापासून अभ्यास करण्याचे व उज्वल यश संपादन करण्याचे आवाहन केले.पहिल्या दिवशी मुलांना गोड खाऊ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्री अशपाक मुजावर यांनी केले तर आभार श्री महेश भोसले यांनी मानले.

# श्री विठ्ठल रुक्मिणीमातेस भाविकाकडून ११ लक्ष रुपयाची देणगी

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई येथील भाविक जयंत दत्तात्रय म्हैसेकर यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीस ११ लक्ष रुपयाची देणगी धनादेश स्वरूपात दिली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने श्री म्हैसेकर यांचा सत्कार मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते श्रींची मूर्ती व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मदन महाराज हरिदास व देणगीदार कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. या देणगीदाराने आतापर्यंत मंदिर समिती एक कोटी रुपयांची देणगी दिली आहे.

# आज केंद्रीय राज्यमंत्री पदाची हैट्रिक साधणारे संघर्षनायक आठवले यांचे मुंबई होणार आगमन

## मुंबई विमानतळ टर्मिनल १ येथे रिपब्लिकन पक्षाच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांचे दि.१६ जून रोजी सकाळी ११ वाजता भव्य स्वागत होणार : सिद्धार्थ कासारे

**मुंबई/दैनिक यशसिध्दी न्यूज**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील एन डी ए सरकारमध्ये केंद्रीय मंत्री मंडळात केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री पदाचा सलग तिसऱ्यांदा पदभार स्वीकारला आहे.केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री पदाची हैट्रिक साधून ना.रामदास आठवले यांचे दि.१६ जून रोजी सकाळी ११ वाजता मुंबई विमानतळावर टर्मिनल १ येथे आगमन होत आहे.त्यावेळी मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मुंबईतील सर्व रिपब्लिकन कार्यकर्त्यांच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांचे भव्य जंगी स्वागत करण्यात येणार आहे.त्यानंतर ना.रामदास आठवले विमानतळावरून थेट चैत्यभूमी येथे दुपारी १ वाजता पोहोचणार आहेत. केंद्रीय राज्यमंत्री पद तिसऱ्यांदा मिळाल्यानंतर मुंबईत पोहोचताच सर्वप्रथम चैत्यभूमी येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन करण्याचा ना.रामदास आठवले यांचा संकल्प आहे. त्यामुळे दि.१६ जून रोजी दुपारी १ वाजता मुंबईत पोहोचताच ना.रामदास आठवले हे चैत्यभूमी येथे पोहोचून भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन करणार आहेत.

केंद्रीय राज्य मंत्री ना. रामदास आठवले यांचे मुंबई विमानतळ येथे स्वागत समारंभास रिपब्लिकन पक्षाच्या मुंबईतील सर्व कार्यकर्त्यांनी दि.१६ जून रोजी दुपारी १२ वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी केले आहे.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष देशभर मजबूत उभा करून केंद्र सरकार मध्ये ही रिपब्लिकन पक्षाच्या निळ्या झेंड्या चे महत्व आणि रिपब्लिकन पक्षाची ओळख देशात ठळक उभी करणारे संघर्षनायक राष्ट्रीय नेते ना.रामदास आठवले हे आंबेडकरी जनतेच्या आशीर्वादाने तिसऱ्यांदा केंद्रीय राज्य मंत्री झाले आहेत. काही नेते रिपब्लिकन संकल्पना मिटविण्याचा प्रयत्न करीत आहेत मात्र ना.रामदास आठवले यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या संकलपनेतील रिपब्लिकन पक्ष देशभर मजबुतीने जिवंत ज्वलंत ठेवला आहे. त्याचा सर्व रिपब्लिकन कार्यकर्त्यांना देशभरातील भीम सैनिकांना अभिमान आहे.आपल्या लाडक्या प्रिय नेत्याने भारत सरकार मध्ये तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री पदाचा बहुमान मिळविला त्याचा आनंद देशभर साजरा होत आहे.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय विचार वारसा रिपब्लिकन वारसा पुढे घेऊन जात असल्यामुळेच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा आशीर्वाद रामदास आठवलेंना प्राप्त होत आहे.त्यामुळे आज तीन वेळा केंद्रीय राज्यमंत्री पदाचा बहुमान रामदास आठवले यांना मिळाला आहे.केंद्रीय राज्यमंत्री पदाचा



कार्यभार तिसऱ्यांदा स्वीकारल्या नंतर ना. रामदास आठवले दिल्लीतून मुंबईला दि.१६ जुना रोजी सकाळी ११ वाजता मुंबईत येत आहेत.मुंबई च्या डोमेस्टिक विमानतळ टर्मिनल १ येथे ना.रामदास आठवले यांचे भव्य स्वागत रिपब्लिकन पक्षाच्या वतीने करण्यात येणार आहे.या वेळी रिपाइं चे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; सुरेश बार्शिंग मुंबई कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड, मुंबई सरचिटणीस विवेक पवार,दयाळ बहादूर आशाताई लांडगे, अभया ताई सोनवणे, उषाताई रामलू , ईशान्य मुंबई जिल्हा अध्यक्ष अजित रणदिवे; संजय डोळसे; रमेश गायकवाड; प्रकाश जाधव; संजय पवार आणि साधू कटके हे मुंबईतील सर्व जिल्हा अध्यक्ष आणि कार्यकर्ते सर्व पदाधिकारी महिला आघाडी युवक आघाडी सर्व आघाडी चे रिपब्लिकन कार्यकर्ते या स्वागत सोहळ्यास उपस्थित राहतील तसेच वरिष्ठ नेते राष्ट्रीय कमिटी आणि राज्य कमिटी चे मुंबईतील पदाधिकारी उपस्थित राहतील अशी माहिती रिपाइं चे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी दिली आहे.

# मनसेच्या मागणीला यश... मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूर आषाढी यात्रा अनुदान दहा कोटी रुपये केले मंजूर

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दी न्यूज**

पंढरपूरच्या आणि मंगळवेढा तालुक्यातील विविध प्रश्र्नावर मनसे नेते बाळ नांदगावकर आणि मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची घेतली भेट त्यावेळी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्र्न संदर्भात मनसे नेते नांदगावकर आणि मनसे नेते दिलीप बापू धोत्रे मनसे नेते जयप्रकाश बाविस्कर यांनी भेट घेऊन पंढरपूर मंगळवेढा विधानसभा क्षेत्रातील विविध समस्यावर चर्चा करून निवेदन दिले



येणाऱ्या आषाढी एकादशीला पंढरपूर शहरात जास्तीत जास्त मदत करावी व आषाढी यात्रेस येणाऱ्या भाविक भक्तांची भक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी काळजी घ्यावी आणि आषाढी एकादशी निमित्त येणाऱ्या प्रत्येक दिंडीला शासनाने मदत करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली दरवर्षी आषाढी एकादशीसाठी महाराष्ट्र शासन पाच कोटी रुपये देत होते परंतु हे यात्रा अनुदान अतिशय कमी पडत असल्याने यावर्षी दहा कोटी रुपये यात्रा अनुदान देण्याची मागणी करण्यात आली तसेच पंढरपुरामध्ये प्रचंड पाऊस पडल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे तसेच घरामध्ये पाणी शिरले फिरले असल्यामुळे घरातील सामानाचे नुकसान झालेले आहे त्यांना मदत करावी असे आव्हान मुख्यमंत्र्याकडे करण्यात आलेली आहे त्याचबरोबर आषाढी यात्रेसाठी दहा कोटी अनुदान द्यावे अशी मागणी मुख्यमंत्री कडे केली आहे तसे मुख्यमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यास आदेश दिलेले आहेत सदर नागरिकांचे नुकसान झालेले त्याचे पंचनामे करून त्यांना मदत करण्यात यावी असे संभाजी राजे सूचना मुख्यमंत्र्याकडून देण्यात आले आहेत